| | |
|---|---|
| MHKO050002642021 | **म.कौ.हि.सं.का.अर्ज नं. ०९/२०२१**<br>**निशाणी क्र.५ वर आदेश**<br>(**राणी शिवाजी कांबळे वि. शिवाजी तातोबा कांबळे व इतर**) |

**१.** यातील अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ च्या कलम २३ नुसार अंतरीम आदेशाकरिता दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदार यांनी वि.प. यांचे विरोधात कौंटुंबीक हिंसाचार प्रतिबंधक कायदा अन्वये कोर्ट मजकूरी अर्ज दाखल केला आहे. सदरचा अर्ज चालणेस दिनावधी लागणार आहे. सदर कालावधीत अर्जदार यांना कोणतेही उत्पनाचे साधन नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जाद्वारे अंतरिम आदेश मिळण्याकरीता अर्जदारने सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदारने मुळ अर्जात केलेली सर्व कथने ही अंतरिम अर्जाचा भाग समजण्याची विनंती केली आहे.

**३.** अर्जाचे अवलोकन केले असता, अर्जदारने असे कथन केले आहे की, दि.२५/०२/२००७ रोजी अर्जदार व वि.प.नं.१ यांचा विवाह झालेला आहे. अर्जदार व वि.प.नं.१ यांचे दरम्यान अद्यापही पती–पत्नी नाते अस्तित्वात आहे. तसेच अर्जदार व वि.प.नं.१ यांचे पासून दि.१४/११/२००८ रोजी कु.श्रेया नावाची मुलगी झाली व दि.०१/०१/२०१४ रोजी अदित्य नावाचा मुलगा झाला. विवाहानंतर सुरवातीचे काही दिवस वि.प. यांनी त्यांना व्यवस्थीत नांदवले. त्यानंतर वि.प.नं.२ व ३ हे सतत अर्जदार यांना टोमणे मारुन, अश्लील भाषेत शिवीगाळ करत असत. तसेच वि.प.नं.१ हे दररोज रात्री, अपरात्री घरी येवून अर्जदार यांचा शरिरीक व मानसिक त्रास देवून मारहाण करत असत. तसेच वि.प.नं.१ ते ४ हे अर्जदार यांचेकडे त्यांचे वडीलांचे रहाते घर विकून इचलकरंजी येथे फ्लॅट घेणेसाठी माहेरहून ५ लाख रुपये घेवून येणेकरीता तगादा लावला व

जर विकायचे नसेल तर माहेरचे घरे मुलगा अदित्य याचे नावावर करणेस तकादा लावला. अर्जदार यांनी त्यास स्पष्ट नकार देताच जुन २०१८ मध्ये नेसत्या वस्त्रानिशी घराबाहेर काढले आहे. त्यानंतर देखील मुळ अर्जात नमुद केल्याप्रमाणे वि.प. यांनी अर्जदार हिला वेळोवेळी शिवीगाळ व मारहाण करुन छळ केला आहे. वि.प. यांनी अर्जदार यांच्या पालनपोषनाची कोणतीही जबाबदारी घेतलेली नव्हती व नाही. त्यामुळे अर्जदारने प्रस्तुतचा अर्ज वि.प. यांच्या विरुध्द दाखल केला आहे.

**४.** अर्जदार यांनी पुढे असे कथन केले आहे की, वि.प. यांची आर्थिक परिस्थिती खूप चांगली आहे. वि.प.नं.१ हे नोकरीस असून त्यिांना दरमहा चांगल्या पगाराची नोकरी आहे. तसेच त्यांना दरसाल भरपूर उत्पन्न मिळकते. वि.प.नं.१ यांची वाडवडीलार्जित इचलकरंजी येथील शेत जमीन असून त्यापासून त्यांना चांगले उत्पन्न मिळकते. तसेच वि.प.नं.१ यांचे वडील बँकेतून निवृत्त झाल्यामुळे त्यांना दरमहा चांगली पेंशन मिळकते. वि.प. नं.१ यांचेवर अर्जदार यांचेशिवाय कोणीही अवलंबून नाही. अर्जदार या सध्या माहेरी आपल्या मुलागा अदित्यसह आईवडीलांच्याकडे आश्रीतासारखे जीवन जगत आहेत. अर्जदाराचे आईवडील कोणताही कामधंदा करीत नाहीत. त्यामुळे अर्जदार नं.१ व २ यांना पालनपोषनकरीता आर्थिक सहाय्य म्हणून दरमहा रक्कम रुपये १०,०००/–अंतरीम पोटगी वि.प.नं.१ यांनी देणेविषयी आदेश करणेची विनंती अर्जदार यांनी केली आहे.

**५.** वि.प.नं.१ यांनी नि.११ कडे त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जदारच्या अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. वि.प. यांच्या कथनानुसार वि.प.यांनी अर्जदारवर कोणताही कौटुंबीक हिंसाचार केलेला नाही. वि.प. यांनी अर्जदारसोबतचे नाते कबूल केले आहे. वि.प. यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार ह्या कोणत्याही संयुक्तिक कारणांशिवाय भांडणतंटा करत असत. तसेच अर्जदार ह्या वि.प.नं.१ यांना चारचौघात दुरुत्तरे देवून

अपमान करत असत. अर्जदार यांचा स्वभाव पुर्वी पेक्षा जास्तच व रागीट बनला होता व त्या वारंवार विष पिवून आत्हत्या करणा व तुमची सर्वाची नावे चिठ्ठीत लिहीणार अश्या धमकी देत होत्या. वि.प.नं.१ हे कामावर गेले असता अर्जदार यांनी कसलीही कल्पना न देता कोणालाही न सांगता अर्जदार ह्या मुलगा अदित्यला घेवून दि.०७/०६/२०१८ रोजी माहेरी निघून गेल्या. वि.प.नं.१ अर्जदार यांना नांदावयास नेणेकरीता आले असता अर्जदार यांनी वि.प.नं.१ यांना घरात न घेता त्यांचा अपमान करुन परत पाठविले. मुलगी श्रेया व मुलगा अदित्य यांच्या सर्व शिक्षणाची जबाबदारी आजपर्यंत वि.प.नं.१ करत आहेत. वि.प. यांनी अर्जदार नांदणेस येणेकरीता इचलकरंजी कोर्टात एच.एम.पी.नं.५२/२०२० दाखल केला आहे व तो प्रलंबित आहे. अर्जदार यांनीच स्वतःहून वि.प.नं.१ यांचा त्याग केलेला आहे.

६. वि.प.नं.१ हे पुढे असे कथन करतात की, ते रोजंदारीवर कामाला जातात त्यापासून त्यांना रक्कम रुपये १०,०००/– उत्पन्न मिळकत. तसेच अर्जदार ह्या उच्चशिक्षीत असून त्यांना दरमहा १५,०००/– इतका पगार आहे. त्यामुळे अर्जदार ह्या स्वतःचे पालनपोषण करणेस समर्थ आहेत. त्यामुळे वि.प.नं.१ यांची अर्जदार यांना दरमहा रक्कम रुपये १०,०००/– देणेची ऐपत नाही. त्यामुळे वि.प. यांनी सदरचा अर्ज खर्चासहीत नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

७. दोन्ही बाजुंचे विधिज्ञांचा विस्तृत युक्तीवाद ऐकणेत आला. अर्ज, अर्जदारचे शपथपत्र, वि.प.नं.१ ते ५ यांचे म्हणणे व दोन्ही पक्षकारांनी दाखल केलेली कागदपत्रे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले असता खालील मुद्दे माझ्याकडे उपस्थित झाले. त्या प्रत्येक मुद्दयांवर कारणांसहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे सादर केले आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदारवर वि.प. यांनी घरगुती हिंसाचार केल्याचे प्रथम दर्शनी सिध्द होते काय ? | होकारार्थी |
| २. | अर्जदार अंतरिम पोटगी संबधीचे आदेश मिळणेस पात्र आहेत का ? | अंशतः मंजूर |
| ३. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## – कारणमिमांसा –

**मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबत :–**

८. वरील मुद्दे एकमेकांशी सलंग्न असल्यामुळे त्यावर दिलेल्या कारणांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्र चर्चिले आहेत.

९. वि.प. यांनी अर्जदार सोबत विवाह झाल्याचे व त्यांना मुलगी श्रेया व मुलगा अदित्य असल्याचे नाकारलेले नाही. त्यामुळे अर्जदार व वि.प. यांच्यामध्ये वैवाहीक नातेसंबंध होते हे सिध्द होते. अर्जदार यांनी त्यांचे मुळ अर्जात कथन केलेप्रमाणे वि.प. यांनी अर्जदार यांना वेळोवेळी मानसिक व शारिरीक त्रास दिलेला आहे. अर्जदारच्या कथनानुसार वि.प. हे अर्जदार हिचे सोबत लग्नात जास्त हुंडा दिला नाही या कारणांवरुन भांडण करत होते.

१०. अर्जदारने तिच्या कथनांच्या पृष्ठर्थ प्रतिज्ञापत्र देखील दाखल केले आहे. याउलट वि.प.नं.१ यांचे नि.११ कडील म्हणणे पाहिले असता त्यामध्ये अर्जदार यांनी केलेल्या आरोपाबाबत वि.प. यांनी अर्जदारची सर्व कथने नाकारुन अर्जदार हिच्यावर ती व्यवस्थीत नांदत नसल्याचे कथन केले आहे. वि.प. यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की अर्जदार ही कोणत्याही सबळ कारणाशिवाय स्वतःहून घर सोडून गेली आहे. वि.प.यांनी अर्जदार हिचा त्याग केलेला नाही. त्यामुळे अर्जदार ही पोटगी मिळण्यास पात्र नाही. अर्जदार हिने तिच्या अर्जात नमुद केलेल्या कथीत कौटुंबीक हिसांचाराबाबत तिचे

प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. तसेच अर्जदार यांनी मालमत्ता, उत्पन्न व दायित्व बाबतचे प्रतिज्ञापत्र देखील दाखल केले आहे.

**११.** वि.प. यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये कौटुंबीक हिसांचाराबाबतची सर्व कथने नाकारली आहेत व अर्जदार हिच्यावर ती व्यवस्थीत नांदत नसलेची कथने केलेली आहेत. तसेच अर्जदार नं.१ या स्वतः माहेरी निघून गेले असल्याचे कथन वि.प. यांनी केले आहे. परंतु केवळ वि.प.यांनी तिला घराबाहेर काढलेले नाही याकारणांवरुन तिच्यावर कौटुंबीक हिसांचार झालेलाच नाही असा निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. तसेच अर्जदार व वि.प.नं.१ यांना मुलगी श्रेया व मुलगा अदित्य ही मुलगी असल्याचे वि.प.यांना कबूल आहे. तसेच अर्जदार ह्या आपला मुलगा अदित्यला घेवून वि.प.नं.१ यांना सोडून गेल्यापासून त्यांची मुलगी श्रेया वि.प.नं.१ यांचेकडेच राहत आहे व तिचे चांगल्याप्रकारे पालनपोषण करत असल्याचे कथन केले आहे. परंतु अर्जदार क्र.२ अदित्य याच्या शिक्षणाचा खर्च अर्जदार क्र.१ ही करते असे कथन अर्जदाराने आपल्या अर्जात केले नाही. यावरुन प्रथमदर्शीनी ही बाब स्पष्ट होते की, वि.प.नं.१ हे अर्जदार क्र.२ च्या शिक्षणाचा खर्च करत आहे. वि.प.नं.१ यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये कोठेही त्यांनी अर्जदार यांच्या पालनपोषनासाठी काही तजवीज केल्याचे कथन केलेले नाही.

**१२.** अर्जदार नं.१ व २ यांच्या पालनपोषनाची नैतीक व कायदेशीर जबाबदारी ही वि.प.नं.१ यांचीच आहे. अर्जदार नं.२ हिच्या जन्मापासून ते आजअखेर तिच्या पालनपोषनासाठी अगर औषधोपचारासाठी काय तजवीज केली याबाबत वि.प. यांनी कोणतेही कथन केलेले नाही. कोणतीही विवाहीत स्त्री विनाकारण पतीचा त्याग करुन माहेरी राहण्यास जाणार नाही. अर्जदारच्या अर्जातील कथने व याकामी अर्जदार व वि.प. यांनी हजर केलेल्या शपथपत्र व कागदपत्रांचे अवलोकन केले असता, प्रथमदर्शनी

अर्जदारच्या कथनामध्ये तथ्य असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रथमदर्शनी अर्जदार हिचेवर कौंटुंबीक हिंसाचाराच्या घटना घडल्या आहेत यामध्ये सत्यता दिसून येते.

**१३.** वि.प.नं.१ यांनी अर्जदार हया माहेरी राहत असल्याचे नाकारलेले नाही. अशा परिस्थितीत वि.प.नं.१ यांनी अर्जदार व तिच्या मुलाची उदरनिर्वाहाची सोय पाहणे गरजेचे आहे. अर्जदारच्या कथनानुसार त्यांच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदारच्या कथनानुसार वि.प. हे नोकरी करत असून त्यांना चांगल्या प्रकाराची नोकरी असल्याचे कथन केले आहे, परंतु त्यांना कुठे नोकरी आहे आणि किती दरमहा पगार मिळतो याचा उल्लेख अर्जदाराने अर्जात केल्याचे दिसून येत नाही. तसेच अर्जदार यांनी वि.प. यांच्या शेतीविषयी ७/१२ चे संगणकीय प्रत हजर केले आहेत. सदरील ७/१२ च्या पाहणी केली असता असे दिसून येते की, वि.प.नं.३ हे जमीनीचे मालक व कब्जेदार आहेत. परंतु वि.प.नं.३ हे जमीनीचे मालक व कब्जेदार असल्यामुळे त्या जमीनीतून वि.प.नं.१ यांना उत्पन मिळते असे म्हणता येणार नाही. तसचे वि.प.नं.१ यांना किती उत्पन मिळते याचा उल्लेख अर्जात केलेला नाही.

**१४.** अर्जदार यांनी वि.प.नं.१ यांच्या नोकरीबाबत कोणत्याही प्रकारचा पुरावा अगर कागदपत्रे सदर कामी हजर केलेली नाहीत. तसेच अर्जदार यांनी आपल्या शपथपत्रामध्ये वि.प.नं.१ हे काय काम करतात याबद्दलचे कोणतेही कथन केले नाही. परंतु वि.प.नं.१ यांनी नि.१६ सोबत अर्जदार नोकरी करत असल्याबाबचे त्यांच्या पगाराचे खातेउतारे याकामी हजर केले आहे. खातेउताऱ्यावरुन असे दिसून येते की, अर्जदार ही कोठे नोकरी करते याचा बोध होत नाही. तसेच अर्जदार ही जर नोकरी करत असेल तर वि.प. हे तिचे वेतन प्रमाणपत्र हजर करु शकले असते. परंतु अभिलेखावर वि.प.नं.१ यांनी अर्जदार हिचे कोणतेही प्रमाणपत्र दाखल केले नाही.यावरुन हि बाब स्पष्ट होते की, अर्जदार ही नोकरी

करत नाही. तसेच वि.प.नं.१ यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे वि.प. यांना १०,०००/– रुपये दरमहा उत्पन्न मिळत असल्याचे दिसून येते. वि.प.नं.१ यांनी नि.१४ कडे मालमत्ता व दायित्व याबाबत शपथपत्र दाखल केले आहे. त्या शपथपत्रावरुन असे दिसून येते की, वि.प.नं.१ हे रक्कम रुपये १५,०००/– चे उत्पन मिळते. याउलट अर्जदार हिने वि.प.नं.१ हे अर्जदार क्र.१ व २ यांना दरमहा १०,०००/– पोटगी देवू शकतात हे दाखवण्याकरीता वि.प.नं.१ यांचे मालमत्ता व दायित्वबाबत शपथपत्र दाखल केले नाही. यावरुन प्रथमदर्शीनी असे दिसून येते की, वि.प.नं.१ यांना दरमहा १५,०००/– चे उत्पन्न मिळत असण्याची शक्यता आहे.

**१५.** अर्जदार हिने तिच्या स्वतंत्र निवासी व्यवस्था करुन द्यावी अगर निवासी पोटी दरमहा रक्कम रुपये ५,०००/– आदेश व्हावा अशी विनंती केली आहे. परंतु अर्जदाराच्या अर्जात तिने आपल्या आईवडीलांकडे राहत असल्याचे नमुद केल आहे. त्यामुळे सद्यस्थितीत तिच्या निवासाबाबत आदेश करणे उचित ठरणार नाही.

**१६.** अर्जदार हिने तिची मुलगी हिचा प्रत्येक आठवठयाच्या शनिवारी व रविवारी ताबा मिळावा तसेच शाळेची उन्हाळी व दिवाळी सुट्टीच्या दिवशी ताबा मिळावा याबाबत आदेश करण्याची विनंती केली आहे. अर्जदाराने नि.१७ प्रमाणे श्रेया हिचा ताबा मिळणेकरीता स्वतंत्र अर्ज दाखल केला होता व तो अर्ज कारणे देवून नामंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे अर्जदारची सदरची विनंती मंजूर करता येणार नाही.

**१७.** त्यामुळे अर्जदार व वि.प.नं.१ यांचे मधील वैवाहीक नातेसंबंध लक्षात घेता अर्जदारच्या उदरनिर्वाहाची सोय करण्याची प्राथमिक जबाबदारी ही वि.प.नं.१ यांची आहे. अशा परिस्थितीत वि.प.नं.१ यांनी अर्जदार क्र.१ व २ यांना अंतरिम आर्थिक मदत म्हणून

रक्कम रुपये ५,०००/– प्रति महिना देणेबाबत आदेश करणे योग्य होईल. सबब मुद्दा क्रमांक १ चे होकारार्थी उत्तर देवून, मुद्दा क्रमांक २ अशंतः मंजुर करण्यात येतो व मुद्दा क्र.३ करीता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

१. अर्ज अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

२. वि.प.नं.१ यास असे आदेशित करण्यात येते की त्यांनी अर्जदार नं.१ व २ यांना अंतरिम पोटगी म्हणून रक्कम रुपये ५,०००/–(फक्त पाच हजार रुपये) अर्ज दाखल तारखेपासून ते मूळ अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत द्यावेत.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहिर)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
SANJAY DIGAMBERRAO
WANKHEDE
Date: 2023.07.15
18:09:31 +0530

**दि.१५/०७/२०२२** **(संजय दि.वानखेडे)**
**इचलकरंजी** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१, कोर्ट नं.५ इचलकरंजी**

**<u>प्रमाणपत्र</u>**

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. निकालपत्र आदेश यामधील सर्व मजकूर मूळ निकालपत्र आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | श्री. मकरंद भि.जाधव |
| न्यायालयाचे नांव | ५ वे सह दि.न्या.क.स्तर, इचलकरंजी |
| श्रुतलेखन/टाईप केल्याचा दिनांक | १५/०७/२०२२ |
| न्यायिक अधिका–यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | १५/०७/२०२२ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | १७/०७/२०२२ |